# प्रसिध्दी निवेदन

# राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा (NTS) २०१८-१९

# परीक्षा दि.०४.११.२०१८

# अंतिम उत्तरसूची

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदमार्फत दिनांक ०४ नोव्हेंबर २०१८ रोजी घेण्यात आलेल्या राज्यस्तर राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेची अंतिम उत्तरसूची परिषदेच्या www.mscepune.in व https://nts.mscescholarshipexam.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर परीक्षेच्या MAT व SAT पेपरच्या प्रश्नपत्रिकेतील कोणत्याही प्रश्नाबाबत किंवा पर्यायी उत्तराबाबत त्रुटी/ आक्षेप असल्यास ते परीक्षा परिषदेकडे दिनांक १९/११/२०१८ अखेरपर्यंत पाठविण्याबाबत दिनांक १३/११/२०१८ रोजीच्या प्रसिध्दी निवेदनाद्वारे कळविण्यात आले होते. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या लेखी निवेदनांवर विषयतज्ज्ञांचे अभिप्राय घेऊन अंतिम उत्तरसूची प्रसिध्द करण्यात येत आहे. या अंतिम उत्तरसूचीबाबत कोणतेही निवेदन/आक्षेप स्विकारले जाणार नाहीत, तसेच सदर परीक्षेसाठी गुणपडताळणी केली जात नाही याची मुख्याध्यापकांनी, पालकांनी व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

या अंतिम उत्तरसूचीनुसार राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेचा निकाल यथावकाश परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याची ही संबंधित मुख्याध्यापकांनी, पालकांनी व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

(तुकाराम सुपे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे- ४११००१

दिनांक :- 01 /12/२०१८